# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**बाब क्रमांक: ६९, रूपये:- १,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ४८३५ | १० | तिवसा मतदारसंघातील श्री क्षेत्र महारुद्र मारुती संस्थान, जहाँगीरपूर ता. तिवसा येथे दरवर्षी भाविक राज्यातून, इतर राज्यातून तसेच विदेशातून मोठ्या प्रमाणात दर्शनाकरीता येत असतात. तसेच दैनंदिन पुजाविधीला सतत भाविकांची वर्दळ सुरु असते. साधारणपणे 5 लाखाचे वर भाविक दरवर्षी येथे भेट देत असुन मुलभूत सुविधा भाविकांना मिळाव्यात याकरीता या तिर्थस्थाळाला 'ब' वर्ग दर्जा चा प्रस्तावचा प्रस्ताव जि.प. अमरावतीने शासनास सादर आहे. प्रस्तावास निधीसह मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२) | ४८४६ | १० | "ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून श्री. संत सेवालाल महाराज पोहरादेवी व उमरी पोहरादेवी या तीर्थक्षेत्र विकास आराखडा सह इतर ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र आणि पर्यटन आराखड्यासाठी निधीची तरतूद करण्यात येत असणे, त्याचबरोबर मोठी दुरावस्था झालेल्या आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या पोमभुर्णा, तालुका देवगड जिल्हा सिंधुदुर्ग येथील स्मारकासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, व या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| (३) | ४८४७ | १० | "ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून श्री. संत सेवालाल महाराज पोहरादेवी व उमरी पोहरादेवी या तीर्थक्षेत्र विकास आराखडा सह इतर ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र आणि पर्यटन आराखड्यासाठी निधीची तरतूद करण्यात येत असणे, राज्याला फार मोठी संत परंपरा लाभलेली असणे, त्यामध्ये संत नामदेवांचे योगदान मोठे असून हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव या गावी संत नामदेवांचे मोठे स्मारक असून या स्मारकाचे काम अद्याप अपूर्ण असल्यामुळे सदर कामाला देखील मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देऊन शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ४८४८ | १० | "ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून श्री. संत सेवालाल महाराज पोहरादेवी व उमरी पोहरादेवी या तीर्थक्षेत्र विकास आराखडा सह इतर ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र आणि पर्यटन आराखड्यासाठी निधीची तरतूद करण्यात येत असणे, ग्रामविकास विभागाच्या मार्फत ग्रामीण भागातील यात्रा स्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम घेण्यात आलेला असून यामध्ये पुणे, नगर आणि रायगड या तीन जिल्ह्यात मिळून असलेल्या अष्टविनायक परिमंडळाच्या पर्यटन विकासाच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेला असणे, तथापि, या परिमंडळाच्या पर्यटन विकासासंदर्भात मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (५) | ४८४४ | १० | दर्यापूर मतदारसंघातील कोळयांची काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान , सामदा (काशीपूर) ता. दर्यापूर जि. अमरावती या तीर्थक्षेत्रास दिनांक १० नोव्हेंबर २०२२ रोजी "ब " वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला असून राज्यभरातून येणाऱ्या येथील भावीभक्तांना मूलभूत व पायाभूत सुविधा मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद अमरावती मार्फ़त २.९७ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर आहे. प्रस्तावास निधीसह मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित देणे**<br>**बाब क्रमांक: ७०, रूपये:- २२,१४,७२,८०,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (६) | ४७४१ | १०० | ग्रामपंचायत विद्युत एकाची थकबाकी महावितरण कंपनीत प्रदान करण्यासाठी रुपये 2337,00, ००, ००० इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले असेल त्यापैकी रुपये 122,27,20,000 इतका खर्च चालू किती वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवता येणे शक्य आहे म्हणून रुपये 2214,72,80,००० मागणी प्रस्तावित केली आहे परंतु माझ्या डहाणू विधान सभा मतदारसंघातील अनेक ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचे मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने तेथील पथदिवे नव्याने दुरुस्त करून करण्यात यावे तसेच बऱ्याच वाड्या वस्तीवर आजही पथ दिवे नसल्याने तेथे नव्याने पथदिव्यांची निर्मिती करण्यात यावी आणि ज्या ग्रामपंचायत मध्ये पथदिव्यांचे विद्युत देयके थकीत आहेत त्यांचे बिल माफ करून या विधानसभा मतदारसंघातील सर्व गावे, खेडे, पाडे, वस्त्या वरील नागरिकांना मुलभूत सुविधा मिळण्यासाठी पथदिवे लावण्यात यावेत अशी मागणी करत आहे त्यासाठी कृती आराखडा तयार करून प्रत्येक गावातील वाडी वस्ती पाडे येथे कार्यक्रम राबवून त्यास पुरेशा निधी देण्यात यावा तसेच, जिल्हा परिषद शाळांची, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | बालवाडी केंद्रांची, तसेच आदिवासी आश्रम शाळांची जी प्रलंबित देयके आहेत ती तात्काळ शासनाने भरून त्या शाळा बालवाडी केंद्रे व आदिवासी आश्रम शाळा यांचे लाईट पुन्हा जोडून देऊन विद्यार्थ्यांना च्या हितासाठी नावीन्यपूर्ण कार्यक्रम राबवावा अशी ही मागणी करत आहे. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (७) | ४७३५ | १० | चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयासह राज्यातील ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांच्या देयके मोठे प्रमाणात असल्याने त्या देयकांची रक्कम निधी अभावी ग्रामपंचायतीने महावितरण कार्यालयाकडे जमा न करणे, त्यामुळे महावितरण कंपनीने ग्रामपंचायतीच्या पथदिव्याचे विघुत पुरवठा बंद करणे, विघुत पुरवठा बंद करण्यात आल्यामुळे गावात अंधाराचे साम्राज्य पसरलेले असणे,यामुळे लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी विघुत देयके भरण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करणे, मात्र निधीच मिळालेली नसल्याने अनेक गावे अंधारात असून पाणी पुरवठा योजना सुध्दा ठप्प झालेली असल्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयासह राज्यातील ग्रामपंचायतींना पथदिवयाचे रक्कम तातडीने भरण्याबाबत व त्याकरीता निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई